महाराष्ट्र विधानसभा

दुसरे अधिवेशन, २०१६

अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

प्रश्नांची एकूण संख्या - ५०

तेर (जि.उस्मानाबाद) येथी संत गोरोबाकाका समाधी मंदीराच्या कामाची प्रगतीबाबत

(१) १९५२ (२२-१२-२०१४). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तेर (जि.उस्मानाबाद) येथी संत गोरोबाकाका समाधी मंदीराच्या कामाची प्रगती व सद्यःस्थिती काय आहे,

(२) या कामावर आतापर्यंत किती निधी खर्च करण्यात आला आहे,

(३) आणखी किती काम शिल्लक आहे व त्यावर किती खर्च अपेक्षित आहे,

(४) समाधी मंदिराचे काम त्वरीत पूर्ण करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे ?

श्रीमती पंकजा मुंडे (२१-०२-२०१५) : (१) श्रीसंत गोरोबा काका, तेर, ता.जि.उस्मानाबाद यांच्या समाधी मंदिराच्या भोवती पश्चिम ओव्हरीचे काम प्रगतीत आहे. सद्य:स्थितीत पायाचे खोदकाम पूर्ण झालेले असून पायाचे बांधकाम प्रगतीपथावर आहे. तसेच दक्षिण बाजूच्या ओव्हरीचे काम पूर्ण करण्यात आले आहे.

(२) पश्चिम बाजूच्या ओव्हरीचे बांधकाम करणे या कामावरील आतापर्यंत खर्च निरंक आहे. दक्षिण बाजूच्या ओव्हरीचे बांधकाम करणे या कामावर आतापर्यंत रु.९९.९६ लक्ष खर्च झाला असून काम पूर्ण झाले आहे.

(३) पश्चिम बाजूच्या ओव्हरीच्या पायाचे खोदकाम पूर्ण झालेले असून पायाचे बांधकाम प्रगतीपथावर आहे. सदर कामावर अंदाजे रु.१२०.०० लक्ष इतका खर्च अपेक्षीत आहे.

(४) पश्चिम बाजूच्या ओव्हरीचे काम ऑक्टोबर, २०१५ पर्यंत पूर्ण करण्यात येत आहे. तसेच सदर तीर्थक्षेत्रास राज्य निकष समितीच्या दिनांक १६ डिसेंबर, २०१३ च्या बैठकीत “ब” वर्ग दर्जा देण्यात आला असून, शासन निर्णय दिनांक १६ नोव्हेंबर, २०१२ मधील निकषानुसार सदर तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी करावयाच्या कामांसाठी निधी प्रस्तावित करण्यात येईल.

घाटणे (ता.मोहोळ, जि.सोलापूर) गावातील अंतर्गत रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत

(२) ६०६४ (०६-०४-२०१५). श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) घाटणे (ता.मोहोळ, जि.सोलापूर) गावातील अंतर्गत रस्त्याचे क्रॉंक्रिटीकरण करण्यात आले असून या रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे झाले असल्याची तक्रार तेथील ग्रामपंचायत सदस्यांनी माहे डिसेंबर, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान संबंधित अधिका-याकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, त्यात काय आढळून आले व तदनुसार संबंधित अधिकारी व कंत्राटदारांविरुध्द काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे (२३-०६-२०१५) : (१) होय, हे खरे आहे. सदर अर्ज उप अभियंता जि.प.बांधकाम उपविभाग मोहोळ यांचे कडे सादर करण्यात आला होता.

(२) होय, सदर कामाची चौकशी उप अभियंता जि.प. बांधकाम उपविभाग मोहोळ यांनी केली असता सदरचे काम तांत्रिकदृष्ट्या योग्य झाले असल्याचा अहवाल त्यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. सोलापूर यांना सादर केला आहे.

(३) घाटणे (ता.मोहोळ, जि.सोलापूर) गावातील अंतर्गत रस्त्याचे कॉंक्रीटीकरण या कामासाठीचे कंत्राटदार ही ग्रामपंचायत घाटणे असून सदरचे का तांत्रिकदृष्ट्या योग्य झाले असल्याने कारवाईची आवश्यकता नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

भुली (ता.मनोरा, जि.वाशिम) ग्रामपंचायतमधील विविध अनियमिततेबाबत

(३) ९१४२ (०९-०४-२०१५). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भुली (ता.मनोरा, जि.वाशिम) येथील सुमारे २० ग्रामस्थांनी दिनांक १७ नोव्हेंबर, २०१४ पासून तत्कालीन ग्रामपंचायत मधील विविध अनियमितता तसेच गैरव्यवहार व म.न.रे.गा. योजनेमध्ये झालेल्या गैरव्यवहाराविरुध्द उपोषण सुरु केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ग्रामस्थांच्या मागणीवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, संदर्भाधीन विषयानुषंगाने दोषातांवर माहे जानेवारी, २०१५ अखेरपर्यंतच्या कामकाजाची सद्यस्थिती काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे (१९-१०-२०१५) : (१) होय, हे खरे आहे. सदर उपोषण दिनांक १७.११.२०१४ रोजी सुरु झाले होते व दिनांक २०.११.२०१४ रोजी उपोषण कर्त्यांनी उपोषण मागे घेतले आहे.
(२) याबाबत चौकशी समिती नेमुन चौकशी करण्यात आली आहे.
(३) वृक्ष लागवडीच्या कामात कामाचे स्थळाचे योग्य नियोजन तसेच कामाचे योग्य संगोपन व संवर्धन न केल्यामुळे ग्रामसेवक श्री. एन. सी. गजभीये हे दोषी असल्याचे आढळून आल्याने यांचे विरुध्द दोषारोप पत्र १ ते ४ दाखल करुन विभागीय चौकशी प्रस्तावीत केली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

लघु पाटबंधारे विभाग, भंडारा येथे मोठ्या प्रमाणात अधिकारी व कर्मचाऱ्यांची पदे रिक्त असल्याबाबत

(४) ९७७२ (०८-०४-२०१५). श्री.राजेश काशीवार (साकोली) : सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लघु पाटबंधारे विभाग, भंडारा येथे मोठ्या प्रमाणात अधिकारी व कर्मचाऱ्यांची पदे रिक्त असून विभागाशी संबंधित कामकाजासाठी परिसरातील शेतकऱ्यांना त्रास सहन करावा लागत असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ल.पा.विभागाच्या भंडारा येथील विभागीय कार्यालयात वर्ग १ ते ४ ची ११ पदे, साकोली येथील उपविभागीय कार्यालयात ५० पदे, तसेच उपविभाग (उपसा) भंडारा अंतर्गत शाखा लाखांदुर येथे १९ पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, शेतकऱ्यांना शासकीय कामकाजासाठी होणारा त्रास लक्षात घेता, शासन किती कालावधीत ही रिक्त पदे भरणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे (०५-०९-२०१५) : (१) काही प्रमाणात पदे रिक्त आहेत.
(२) होय.
(३) शासन स्तरावर जलसंपदा विभागामार्फत पदे भरण्याची प्रक्रीया सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

नांदुरा (जि.बुलढाणा) तालुक्यातील मौजे पलसोडा फाटा ते अलमपूर रस्त्याची दुरवस्था झाल्याबाबत

(५) १०७४८ (०८-०४-२०१५). श्री.चैनसुख संचेती (मलकापूर) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बुलडाणा जिल्ह्यातील मलकापूर विधानसभा मतदार संघातील नांदुरा तालुकयातील मौजे पलसोडा फाटा ते अलमपूर रस्त्यामधील ३.५ किमी लांबी रस्ता अत्यंत नादुरुस्त असून या

रस्त्यावरुन सर्व सामान्य नागरीक, दुचाकी व चारचाकी वाहन धारकांची गैरसोय होत असल्याची बाब माहे फेब्रुवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली असून या रस्त्याच्या दुरुस्तीसाठी रु. ६० लक्ष निधीची आवश्यकता आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्ता दुरुस्ती करणे अत्यंत गरजेचे आहे, हे ही खरे आहे काय,

(३) उपरोक्त रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करण्याबाबत स्थानिक लोक प्रतिनिधी यांनी मा.कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, खामगांव यांना वेळोवेळी सुचित केले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील (०६-०९-२०१५) : (१) हे खरे आहे. सदर रस्त्याच्या दुरुस्तीसाठी अंदाजे ९०.०० लक्ष निधीची आवश्यकता आहे.

(२) व (३) हे खरे आहे.

(४) व (५) प्रश्नाधीन रस्त्याच्या दुरुस्तीचे कामासाठी उपलब्ध होणारा निधी व निकषाच्या अधीन राहून प्राधान्यक्रमाने अर्थसंकल्पात समाविष्ट करण्याचे नियोजन आहे.

हिंगोली जिल्हयात महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत सिंचन विहिरींची कामे अपूर्णावस्थेत असल्याबाबत

(६) १२९७९ (०८-०४-२०१५). श्री.तानाजी मुटकुले (हिंगोली) : सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्हयात महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत सिंचन विहिरींची अनेक कामे अपूर्णावस्थेत असून काही सिंचन विहिरी मंजूर असून सुध्दा कामे सुरू करण्यात आलेली नाहीत, तसेच वाढीव अंदाजपत्रकाप्रमाणे एकही सिंचन विहिरींचे काम अद्यापपर्यंत मंजूर करण्यात आले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मंजुर सिंचन विहिरींची कामे अपूर्ण असण्याची तसेच काही विहिरींची कामे सुरू न करण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(३) असल्यास, शासनाच्या वाढीव मापदंडानुसार नविन सिंचन विहिरींना अद्यापही मंजुरी न देण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(४)असल्यास, जिल्हयातील अपूर्ण व बंद असलेली सिंचन विहिरींची कामे निश्चित किती कालावधीत पूर्ण करण्यात येतील ?

श्रीमती पंकजा मुंडे (२४-०९-२०१५) : (१) हिंगोली जिल्हयात ४१२४ सिंचन विहीरींच्या कामांना प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. त्यापैकी कामाच्या मागणीनुसार २०२६ विहिरींची कामे सुरु करण्यात आली असून ११०० विहिरींची कामे पूर्ण झाली आहेत व ९२६ विहिरींची कामे अपूर्ण आहेत.

(२) व (३) महात्मा गांधी नरेगा ही मागणीप्रवण योजना आहे. तेव्हा मजुरांच्या कामाच्या मागणीअभावी कामे अपूर्ण आहेत. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार अपूर्ण कामे प्रथम पूर्ण केल्यानंतर नवीन कामे सुरु करण्याचे शासनाचे धोरण आहे. तेव्हा सद्यस्थितीत अपूर्ण विहिरीची कामे पूर्ण झाल्यानंतर नवीन सिंचन विहिरींची कामे हाती घेण्यात येतील.
(४) कामाची मागणी प्राप्त होताच तात्काळ नियमानुसार कामे पूर्ण करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

खुलगापूर (ता.लातूर) येथील उच्च पातळी बंधा-यासाठी संपादीत जमिनीमुळे शेतक-यांना शेतीला जाण्यासाठी रस्ते नसल्याबाबत

(७) १३२५८ (०४-०४-२०१४). श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खुलगापूर (ता.लातूर) येथील उच्च पातळी बंधा-यासाठी संपादीत जमिनीमुळे शेतक-यांना शेतीकडे जाण्यासाठी रस्ते नसल्याने शेतक-यांनी शेतीकडे जाण्यासाठी रस्ता उपलब्ध करुन देण्याबाबत जिल्हाधिकारी, लातूर, कार्यकारी अभियंता, निम्न तेरणा प्रकल्प विभाग क्र.२ लातूर यांचेकडे दिनांक १८ सप्टेंबर, २०१३ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे वारंवार मागणी करुनही माहे फेब्रुवारी, २०१५ पर्यंत आजतागायत कोणतीच कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर शेतक-यांना शेतीला जाण्यासाठी अद्यापही रस्ता उपलब्ध करुन देण्याबाबत होणा-या विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत,
(३) तसेच शेतक-यांना रस्ता देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (२४-०२-२०१६) :(१) हे अंशत: खरे आहे.
(२) व (३) खुलगापूर बॅरेजचे काम पूर्ण झाल्यंनंतर पूर्ण क्षमतेने पाणीसाठी केल्यानंतर, खुलगापूर बॅरेजच्या बुडीत क्षेत्रातील चिखलठाणा ते कोळपा या रस्त्याच्या वेगवेगळ्या तीन सखल भागातील अंदाजे ३५० मीटर लांबीत साधारण ६० सेंटीमीटर उंचीचे पाणी थांबते. ही अडचण दूर करण्यासाठी रस्त्याच्या कामाचे विभागामार्फत अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. निधी उपलब्धतेनुसार रस्त्याचे काम प्राधान्याने हाती घेण्यात येईल.
(४) वरीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येत असल्याने प्रश्न उद्भवत नाही.

गोंदिया जिल्हा परिषदेत लघुपाटबंधारे विभागात शासनाची मंजूरी न घेता कामाचे वाटप करण्यात आल्याबाबत

(८) १४०७६ (०८-०४-२०१५). श्री.गोपालदास अग्रवाल (गोंदिया) : सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोंदिया जिल्हा परिषदेत लघुपाटबंधारे विभागात जि.प. मध्ये २०११-१२, २०१२-१३, २०१३-१४ मध्ये शासनाची मंजूरी न घेता आत्याधिक कामाचे वाटप करण्यात आले जेणेकरुन शासनावर आणि जि.प. वर कोट्यवधी रुपयांचा भार पडला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माननीय ग्रामविकास मंत्री यांनी २०१४ नागपूर अधिवेशनात ही बाबला अंशतः खरे सांगुन संबंधितांचे विरुध्द चौकशी सुरु असल्याचे माहिती दिली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी अनियमितता करणा-या संबंधित अधिका-यांवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) तसेच, आता २ महिन्यानंतर ही कोणतीही कार्यवाही झाली नाही, राज्यात एका जिल्हा परिषदेच्या एका विभागाची कार्यालयीन चौकशीसाठी शासनाला किती वेळ लागेल,

(६) अद्याप कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास, त्याची कारणे काय आहेत,

(७) तसेच याबाबत शासनाकडून अपेक्षित कार्यवाही आणि उपाययोजना काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे (०५-१०-२०१५) :(१) होय.

(२) होय.

(३) होय. अधिक्षक अभियंता, लघु सिंचन (जलसंधारण) मंडळ, नागपूर यांनी विभागीय चौकशी केली आहे.

(४) विभागीय चौकशीनुसार संबंधित अधिकाऱ्या विरुध्द लघु सिंचन (जलसंधारण) मंडळ, नागपूर यांच्या दिनांक ७-५-२०१५ च्या पत्रान्वये शिक्षा आदेश पारित केला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

(७) प्रश्न उद्भवत नाही.

तीन लाखांपेक्षा अधिक रक्कमेची विकासकामे करण्यासाठी ई-टेंडरिंग करणे बंधनकारक असल्याबाबत

(९) १४५३७ (०८-०४-२०१५). श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.जगदीश मुळीक (वळगाव शेरी), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्री.योगेश टिळेकर (हडपसर) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तीन लाखांपेक्षा अधिक रक्कमेची विकासकामे करण्यासाठी ई-टेंडरिंग करणे बंधनकारक असताना पुणे जिल्ह्यातील सुमारे ९० टक्के ग्रामपंचायतीमध्ये ई-टेंडरिंग केले गेले नाही, हे माहे फेब्रुवारी, २०१५ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ग्रामपंचायतीचे सरपंच व ग्रामसेवकांची डिजिटल सिग्निचर तयार नसल्याचे तांत्रिक कारण देऊन ई-टेंडरिंग करण्यात आले नाही, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास त्याची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे (२५-०२-२०१६) : (१) व (२) होय अंशत: खरे आहे.
(३) व (४) याबाबत जबाबदार असणाऱ्या अधिकारी/कर्मचारी यांचेवर कारवाई करण्याबाबत मु.का.अ. जि.प. पुणे यांना दिनांकच्या २१.१.२०१६ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

मंजूर झालेल्या १६०० विहिरींपैकी १७५ विहिरीचे काम अपूर्णावस्थेत असल्याबाबत

(१०) १५८७९ (०९-०४-२०१५). श्री.बसवराज पाटील (औसा) : सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तत्कालीन गटविकास अधिका-यांनी, पंचायत समिती, औसा यांनी सन २०११-२०१२ मध्ये शेतक-यांसाठी अपूर्णावस्थेत १६०० विहिरींना मंजूरी दिली असून या मंजूर झालेल्या १६०० विहिरींपैकी १७५ विहिरीचे काम राहिल्याने गेल्या २ वर्षात शासकीय योजनेतून एकाही नवीन विहीरीला मंजूरी न मिळाल्यामुळे तेथील लाभार्थी शेतक-यांना या योजनेंपासून वंचित राहण्याची वेळ आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दुष्काळाच्या खाईत होरपळणा-या शेतकरी आणि जनावरांची अडचण सोडविण्यापेक्षा पंचायत समितीने अपूर्ण विहिरी पूर्ण झाल्याशिवाय नवीन विहिरींना मंजुरी न देण्याचे धोरण अवलंबल्यामुळे लाभार्थी शेतकरी अडचणीत सापडला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, गेल्या २ वर्षापासून प्रलंबित असलेली विहिरींची सर्व प्रकरणे लवकरात लवकर निकालात काढण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

श्रीमती पंकजा मुंडे (२४-०९-२०१५) : (१) हे खरे नाही.
सन २०११-१२ मध्ये गट विकास अधिकारी, पंचायत समिती, औसा यांनी ८९२ सिंचन विहिरींना प्रशासकीय मान्यता दिलेली असून ६४६ कामे सुरु झालेली आहेत. त्यापैकी ५८८ कामे पूर्ण झाली असून ५८ कामे प्रगतीपथावर आहेत. उर्वरित २४६ कामे सुरु झालेली नाहीत.
(२) हे खरे नाही.
(३) अपूर्ण विहिरींची कामे पूर्ण करण्यासाठी विहिरींच्या कामासंदर्भात क्षेत्रीय स्तरावर उद्भवणाऱ्या तांत्रिक अडचणी विचारात घेवून दिनांक ०७ मार्च, २०१५ च्या परिपत्रकान्वये सविस्तर खालीलप्रमाणे अतिरिक्त सूचना देण्यात आल्या आहेत.

१. अतिरिक्त कंत्राटी तांत्रिक अधिका-यांची नियुक्ती करण्यात यावी.
२. मजुरी साहित्याच्या गुणोत्तराबाबत प्रशिक्षण देण्यात यावे.
३. विहिरींच्या पूर्णत्वाचे दाखले निर्गमित करण्यासंदर्भातील अडचणी दूर करण्यात याव्यात

४. क्रेनच्या वापराबाबत व जिल्हा दरसूची (DSR) बाबत स्पष्टीकरण देण्यात यावे.
५. लाभार्थीसाठी ग्रामपंचायतीमार्फत साहित्य पुरवठा पध्दत लागू करण्यात यावी.
६. कुशल खर्चासाठी २५ टक्के अग्रिम देण्यात यावे.

सन २०१५-१६ या आर्थिक वर्षात लेबर बजेट मध्ये सिंचन विहिरींसाठी २०% तरतूद करण्यात आली आहे.

तसेच सिंचन विहिरींच्या कामाच्या साहित्यावरील खर्चासाठी दिनांक २६ मे, २०१५ च्या आदेशान्वये दिनांक ३० जून, २०१५ पर्यंत प्रत्येक जिल्ह्यांना खर्चाचे उद्दिष्ट देण्यात आले आहे.

बुलडाणा जिल्ह्यातील मलकापूर विधानसभा मतदार संघातील रस्त्यांची झालेली दुरवस्था

(११) २५४३४ (१७-०८-२०१५). श्री.चैनसुख संचेती (मलकापूर) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलडाणा जिल्ह्यातील मलकापूर विधानसभा मतदार संघातील मौजे पिंप्रकोळी ते सावरगांव नेहु ग्रा.मा. २, मौजे शिरसोळी ते डीघी ग्रा.मा.१५,मौजे धाडी ते ई.जि.मा.३९, मौजे जुने ईसरखेड ते नविन ईसरखेड ग्रा.मा.५३ तालुका नांदुरा येथील प्रत्येकी १ किमी रस्त्यांची दुरवस्था झालेली असून या रस्त्यांवरुन दुचाकी, चारचाकी वाहनधारकांना व सर्व सामान्य नागरीकांना अशक्यप्राय झाले असल्याची बाब माहे जून, २०१५ वा त्यादरम्यान निदर्शनास आली असून या रस्त्यांच्या डांबरीकरणासाठी प्रत्येकी २० लक्ष रुपये निधीची आवश्यकता आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्याचे डांबरीकरण करणे अत्यंत गरजेचे आहे, हे ही खरे आहे काय,

(३) उपरोक्त रस्त्याचे डांबरीकरण करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी कार्यकारी अभियंता, जि.प.बां.विभाग, बुलढाणा यांना वेळोवेळी सुचित केले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे (३१-१०-२०१५) : (१) व (२) प्रश्नांकित रस्त्याची तात्पुरती दुरुस्ती करण्यात आली असून सद्यस्थितीत सदर रस्त्यावर वाहतुक सुरळीत सुरु आहे.

(३) जिल्हा परिषद बांधकाम विभाग बुलढाणा यांच्याकडे अशाप्रकारचे निवेदन प्राप्त नाही. तथापि सार्वजनिक बांधकाम विभाग, खामगांव यांच्याकडे निवेदन प्राप्त आहे.

(४) संपूर्ण राज्यामध्ये जिल्हा परिषदांच्या अखत्यारितील ग्रामीण मार्ग व इतर जिल्हा मार्ग रस्त्यांची एकूण लांबी २३६८९०.०४ कि.मी. असून सदर रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी शासनाकडे उपलब्ध असलेल्या निधीचे वाटप रस्त्याच्या लांबीच्या प्रमाणात करण्यात येते.

प्रश्नांकित मौजे पिंप्रिकोळी ते सावरगाव नेहु रस्ता सद्यस्थितीत आहे. उर्वरीत रस्त्यांच्या खराब लांबीतील दुरुस्तीची कामे जिल्हा परिषदेला विविध योजनांमधून प्राप्त निधी व निकषाच्या अधिन राहून टप्प्या टप्प्याने करण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

मोरगांव (ता.बारामती, जि.पुणे) तीर्थक्षेत्रास निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

(१२) २६५९६ (१७-०८-२०१५). श्री.अर्जुन खोतकर (जालना) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मोरगांव (ता.बारामती, जि.पुणे) हे अष्टविनायकांपैकी एक तीर्थक्षेत्र असल्याने शासनाने या तीर्थक्षेत्रास "ब" वर्ग तीर्थक्षेत्र म्हणून माहे ऑगस्ट, २०१४ च्या दरम्यान घोषित केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,शासनाने उक्त तीर्थक्षेत्रास "ब" वर्ग तीर्थक्षेत्र घोषित करुन अद्याप त्यास शासनाने निधी उपलब्ध करुन दिला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर तीर्थक्षेत्रास त्वरित निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे ?

श्रीमती पंकजा मुंडे (१४-०९-२०१५) : (१) होय.

राज्य निकष समितीच्या दिनांक ५ जुलै, २०१४ रोजी झालेल्या बैठकीत श्री.मोरगांव, ता.बारामती, जि.पुणे या तीर्थक्षेत्रास "ब" वर्ग दर्जा देण्यात आला आहे.

(२) व (३) तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी करावयाची प्रस्तावित कामे शासन निर्णय दिनांक १६ नोव्हेंबर, २०१२ मधील निकषानुसार नसल्याने, सदरहू निकषानुसार प्रस्तुत तिर्थक्षेत्राच ठिकाणी करावयाच्या कामांची सविस्तर अंदाजपत्रके (रु.२.०० कोटीच्या मर्यादेत) जिल्हा परिषद, पुणे यांच्याकडून मागविण्यात आली आहेत. सदर अंदाजपत्रके प्राप्त झाल्यावर, प्रस्तुत तिर्थक्षेत्राच्या ठिकाणी करावयाच्या कामांना निधी देण्याबाबतचा प्रस्ताव राज्य निकष समितीच्या बैठकीत सादर करण्यात येईल.

पुणे येथील शिरुर तालुक्यातील दहिवडी गावामध्ये ओढयावर बांधलेल्या धरणाची दुरवस्था झाल्याबाबत

(१३) २९३०७ (२२-०१-२०१६). डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.नसीम खान (चांदिवली) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील शिरुर तालुक्यातील दहिवडी गावामध्ये ओढयावर बांधलेल्या धरणाच्या संरक्षक भितींचा पाया पुर्णपणे खचला असून त्यामुळे काही कालावधीतच हे धरण नष्ट होण्याची शक्यता आहे, परंतु संबंधित विभागाचे याकडे दुर्लक्ष होत असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गावातील नागरिकांना मोठ्या प्रमाणात पाण्याचा उपयोग होत असलेले हे धरण दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (१५-०३-२०१६) : (१) नाही.

दहिवडी लघुपाटबंधारे तलावाची संरक्षक भिंत खचलेली नाही. सदर तलाव सुस्थितीत असल्याने तलावास कोणत्याही प्रकाराचा धोका नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

मंगळवेढा (जिल्हा सोलापूर) तालुक्यातील मजुरांना काम मिळण्याबाबत

(१४) २९४०० (२२-०१-२०१६). श्री.भारत भालके (पंढरपूर) : सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मंगळवेढा (जिल्हा सोलापूर) तालुक्यातील दुष्काळी परिस्थितीमुळे बागायती क्षेत्र संकटात असल्याने ३५ गावातील जवळपास ५० हजार मजुरांवर उपासमारीची वेळ आली असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी मजुरांना काम मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे (२१-०३-२०१६) : (१) हे खरे नाही.

(२) सर्व ग्रामपंचायतीकडे नवीन मजूरांच्या नोंदणीसाठी नमुना क्र.१. नमुना क्र. ३ (जॉबकार्ड), काम मागणी साठी नमुना क्र.४ हे पुरेशा प्रमाणात उपलब्ध करण्यात आलेले आहे.

सन २०१६-१७ च्या आर्थिक वर्षासाठीच्या लेबर बजेटमध्ये ६० टक्के जलसंधारण व कृषिविषयक कामे घेण्यात आलेले आहेत.

सन २०१६-१७ चे लेबर बजेट तयार करताना प्रशिक्षीत BPT पथकांमार्फत सोलापूर जिल्ह्यातील अक्कलकोट, माढा, मंगळवेढा व दक्षिण सोलापूर या तालुक्यामध्ये वंचीत घटकातील कुटूंबाना उपजीवीकेचे साधन उपलब्ध करुन देण्यासाठी तसेच त्यांचे जीवनमान उंचविण्यासाठी सर्वकष सहभागी नियोजन प्रक्रियेमार्फत (IPPE-२) सर्वेक्षण करण्यात आलेले आहे.

मग्रारोहयो अंतग्रत कामे व मजुर उपस्थिती वाढविण्यासाठी ग्रामपंचायत स्तरावर दवंडी देण्यात येत आहे. सरपंच, ग्रामसेवक व तलाठी यांच्या सभा, कार्यशाळा घेण्यात येत आहेत. तसेच मोबाईल व्हॅनद्वारे जनजागृती करण्यात आलेली आहे.

मंगळवेढा तालुक्याती सद्य:स्थिती शेल्फवर ग्रामपंचायत निहाय ५९८ कामे व यंत्रणा निहाय ३९३ कामे अशी एकूण ९९१ कामे शेल्फवर असून याची मजुर क्षमता २.१९ लक्ष मनुष्य दिवस इतकी आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

वाशिम जिल्ह्यातील आसेगाव पेन येथील पैनगंगा नदीवर कोल्हापूरी बंधाऱ्याला प्रत्येक गाळ्यात नवीन गेट बसविण्याबाबत

(१५) २९७१७ (१४-०१-२०१६). श्री.अमित झनक (रिसोड), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशिम जिल्ह्यातील आसेगाव पेन येथून जवळच असलेल्या येवती गावालगत पैनगंगा नदीवर कोल्हापूरी बंधारा बांधण्यात आला आहे, परंतु येथे जुनेच गेट बसविण्यात आले असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बंधाऱ्याला प्रत्येक गाळयात नवीन गेट बसविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (२१-०३-२०१६) :(१) होय,

येवती कोल्हापूरी बंधारा येथे उपलब्ध असलेले जुने गेट टाकून पाणी साठा करण्यात आला.

(२) सदर कोल्हापूरी बंधाऱ्यांच्या दुरुस्तीचे काम जलयुक्त शिवार अभियान कार्यक्रमाअंतर्गत समाविष्ट करणेबाबत प्रस्तावित करण्यात आले आहे. निधी उपलब्धतेनुसार कामे करण्याचे नियोजित आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

ब्रम्हवाकडी (ता.सेलू, जि.परभणी) येथील लोअर दुधना प्रकल्प निधी अभावी प्रलंबित असल्याबाबत

(१६) २९७३६ (१४-०१-२०१६). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ब्रम्हवाकडी (ता.सेलू, जि.परभणी) येथील लोअर दुधना प्रकल्पास निधी मिळत नसल्याने हा प्रकल्प प्रलंबित असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागील १५ वर्षापासून प्रकल्प प्रलंबित असल्याने तो पूर्ण होण्याकरीता ६०० कोटीच्या निधीची आवश्यकता असून याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (२३-०३-२०१६) : (१) अंशत: खरे आहे.

सुधारीत प्रशासकीय मान्यतेअभावी प्रकल्पाची कामे मंदावली आहेत.

(२) सदर प्रकल्पास सन २०१५-१६ मध्ये अर्थसंकल्पाद्वारे रु. ३० कोटी व पुनर्विनियोजनाद्वारे रु. १२२.८३९० कोटी असे एकूण रु. १५२.८३९० कोटी इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे. तसेच सुधारीत प्रकल्प अहवालास राज्य तांत्रिक सल्लागार समितीने सहमती दिली असून सुधारीत प्रशासकीय मान्यतेबाबतची कार्यवाही महामंडळ स्तरावर करण्यात येईल.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

वाशिम जिल्ह्यातील लघुपाटबंधारे विभागात रिक्त पदे भरण्याबाबत

(१७) ३११०० (२२-०१-२०१६). श्री.अमित झनक (रिसोड), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशिम जिल्ह्यातील लघुपाटबंधारे विभागांतर्गत २६४ मंजूर पदांपैकी तब्बल १२७ पदे रिक्त आहेत, यातही काही गैरहजर व प्रशिक्षणासाठी निवड झालेल्या कर्मचा-यांची संख्या १७ व १२० कर्मचा-यांच्या खांद्यावर विभागातील इतर कामांचा ताण पडत असल्यामुळे सिंचन प्रकल्पांची ६८ कामे प्रलंबित असल्याचे दिनांक ४ ऑक्टोबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती रिक्त पदे भरण्याबाबत तसेच कर्मचा-यांवरील अतिरिक्त ताण कमी करण्याबाबत व प्रलंबित सिंचन प्रकल्पाची कामे मार्गी लावण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (१६-०३-२०१६) : (१) होय, वाशिम मंडळाअंतर्गत लघुपाटबंधारे विभाग, वाशिम या विभागात एकूण २६४ मंजुर पदांपैकी १२७ पदे रिक्त आहेत. सिंचन प्रकल्पाची कामे विभागातील उपलब्ध आस्थापनेद्वारे प्रगतीत असून प्रशिक्षणासाठी निवड झालेले १७ कर्मचारी पूर्ववत हजर होणार आहेत.

(२) व (३) जलसंपदा विभागातील सहायक अभियंता- श्रेणी २ (स्थापत्य) या संवर्गातील अधिकाऱ्यांच्या रिक्त पदांसाठी मागासवर्गीय अनुशेषांतर्गत १२६ पदासाठी दि. ७/२/२०१६ ते १०/२/२०१६ या कालवधीत परिक्षा घेण्यात आल्या आहेत. तसेच कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) या संवर्गातील एकूण १२५६ पदांच्या सरळसेवा भरती करिता दि. १८/२/२०१६ रोजी जाहिरात प्रसिध्द करण्यात आली असून सदर पदांसाठी दि. २५/३/२०१६ रोजी परिक्षा घेण्यात येणार आहेत. परिक्षेतून प्राप्त होणाऱ्या उमेद्वारांमधून महसुली विभाग वाटप नियम २०१५ नुसार रिक्त पदे भरली जातील.

तसेच वित्त विभागाच्या क्र. संकीर्ण- २०१५/प्र.क्र. ४१/अर्थ १ दि. २/६/२०१५ च्या परिपत्रकानुसार गट "क" संवर्गातील सरळसेवेच्या कोट्यातील रिक्त असणाऱ्या पदांपैकी ५० % किंवा एकूण संवर्गाच्या ४ % यापैकी जे कमी असेल इतकी पदे भरणेबाबत अधीक्षक अभियंता व परिमंडळ अधिकारी, अमरावती यांना दि. २१/१२/२०१५ अन्वये निदेश देण्यात आले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

कोकणात पावसाळ्यात पडणाऱ्या पावसाचे पाणी अडवून ते दुष्काळी भागाकडे वळविण्याबाबत

(१८) ३१४५५ (२२-०१-२०१६). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोकणात पावसाळ्यात पडणाऱ्या पावसाचे पाणी अडवून ते दुष्काळी भागाकडे वळविण्यासाठी कार्यवाही करण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी मा. मुख्यमंत्री यांच्याकडे माहे सप्टेंबर, २०१५ च्या शेवटच्या आठवड्यात केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी आतापर्यंत कोणता निर्णय घेतला व त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) उक्त प्रकरणी कोणतीही कार्यवाही केलेली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत तसेच सदर प्रकरणी दुष्काळी भागाला पाणीटंचाई पासून दूर करण्यासाठी लवकरात लवकर निर्णय घेऊन त्यांची अंमलबजावणी करण्यासंदर्भात आतापर्यंत कोणता पाठपुरावा केला वा करण्यात येत आहे ?

श्री. गिरीष महाजन (१७-०३-२०१६) : (१) होय.

(२) महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण २००५ मधील कलम १५ व १६ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र राज्याचा जल आराखडा तयार करणेचे काम प्रगथी पथावर असून त्यांतर्गत कोकणातील सर्व २५ नदी खोऱ्यांचा आराखडा तयार करणेचे कामही प्रगतीपथावर आहे.

सदर आराखड्यात कोकणात सर्व खोऱ्यांत उपलब्ध होणारे पाणी, त्यापैकी कोकणातील सिंचन व बिगर सिंचनासाठी भविष्यातील तरतूदीसह पाणीवापर व त्यानुसार शिल्लक जलनिष्पत्ती सदर शिल्लक पाणी किती व कोणत्या योजनांद्वारे व कोणत्या खोऱ्यात वळवावयाचे/वळविता येईल याबाबत आकडेवारी अंतिम होणार आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

रायगड जिल्ह्यातील खारभूमी योजनांसाठी मंजुरी देणे व निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

(१९) ३२०२० (१५-०१-२०१६). श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.जीवा गावित (कळवण) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्यातील खाडी व समुद्र लगतच्या क्षेत्रातील भातपिका खालील जमिनीमध्ये समुद्राचे खारे पाणी शिरुन खारभूमी योजनांची कामे अपूर्ण असल्यामुळे बाधीत क्षेत्रात वाढ झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कार्यरत असलेल्या खारभूमी योजना पूर्ण करण्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करणार आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (१५-०३-२०१६) :(१) अंशत: खरे आहे.
(२) रायगड जिल्हयातील नाबार्ड व राज्यनिधी अंतर्गत प्रगतिपथावर असणाऱ्या ३१ खारभूमी योजनांसाठी सन २०१५-१६ करीता रु. ९१४.०५ लक्ष इतक्या निधीची तरतूद करण्यात आली आहे. तसेच दुरुस्तीच्या कामासाठी सन २०१५-१६ करीता रु. ३००.०० लक्ष इतक्या निधीची तरतूद करण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

उरण (जि.रायगड) तालुकयातील चिखली भोम व हरिचंद्र पिंपले येथील बांधबंधिस्तीला भेगा पडल्याने शेतीचे नुकसान झाल्याबाबत

(२०) ३२०२१ (१५-०१-२०१६). श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.जीवा गावित (कळवण) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उरण (जि.रायगड) तालुक्यातील चिखली भोम व हरिचंद्र पिंपले या किनारपट्टीतील गावामध्ये बांधंबधिस्तीला पडलेल्या भेगामुळे भात पिकाखालील १५६ एकर क्षेत्रात खारेपाणी शिरल्याने शेती नापीक झाली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, संबंधित विभागातील भात पिकाखालील जमीन बाधीत होवू नये यासाठी कोणती उपाययोजना करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (१५-०३-२०१६) : (१) व (२) उरण (जि.रायगड) तालुक्यातील चिकली भोम हरिचंद्र पिंपळे ही खाजगी खारभूमी योजना आहे. सदर योजनांची देखभाल व दुरुस्ती संबंधित लाभधारक करतात. सदर योजनेची कामे शासनामार्फत करण्यात येत नाहीत. तथापी या योजना CSR निधी अंतर्गत होण्याकरिता प्रयत्न करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

नांदेड जिल्हयातील लेंडी प्रकल्प विभागात पदे रिक्त असल्याबाबत

(२१) ३२२४५ (२२-०१-२०१६). श्री.सुभाष साबणे (देगलूर) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदेड जिल्हयातील लेंडी प्रकल्प विभाग अंतर्गत मंजूर असलेल्या एकूण पदापैकी अधिकारी व कर्मचारी यांचे ५८ पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर पदे रिक्त असण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, उक्त रिक्त पदे भरण्यासंबंधी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (१६-०३-२०१६) : (१) होय.

(२) व (३) जलसंपदा विभागातील सहायक अभियंता-श्रेणी २ (स्थापत्य) या संवर्गातील अधिकाऱ्यांच्या रिक्त पदांसाठी मागासवर्गीय अनुशेषांतर्गत १२६ पदासाठी दि. ७/२/२०१६ ते १०/२/२०१६ या कालावधीत परिक्षा घेण्यात आल्या आहेत. तसेच कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) या संवर्गातील एकूण १२५६ पदाच्या सरळसेवा भरती करिता दि. १८/२/२०१६ रोजी जाहिरात प्रसिध्द करण्यात आली असून सदर पदांसाठी दि. २५/३/२०१६ रोजी परिक्षा घेण्यात येणार आहेत. परिक्षेतूप प्राप्त होणाऱ्या उमेदवारांमधून महसूली विभाग वाटप नियम २०१५ नुसार रिक्त पदे भरली जातील.

तसेच वित्त विभागाच्या क्र संकीर्ण- २०१५/प्र.क्र.४१/अर्थ १ दि. २/६/२०१५ च्या परिपत्रकानुसार गट "क" संवर्गातील सरळसेवेच्या कोट्यातील रिक्त असणाऱ्या पदांपैकी ५० % किंवा एकूण संवर्गाच्य ४% यापैकी जे कमी असेल इतकी पदे भरणेबाबत अधीक्षक अभियंता व परिमंडळ अधिकारी, औरंगाबाद यांना दि. २१/१२/२०१५ अन्वये निदेश देण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

नांदेड जिल्ह्यातील तळणी बृहत लघु पाटबंधारे (ता.बिलोली) या प्रकल्पातंर्गत बाधित गावातील प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या जमिनीचा वाढीव मोबदल्यासाठी निधी मिळण्याबाबत

(२२) ३२२४८ (२२-०१-२०१६). श्री.सुभाष साबणे (देगलूर) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्ह्यातील तळणी बृहत लघु पाटबंधारे प्रकल्प (ता.बिलोली) या प्रकल्पातंर्गत बाधित जिगळा, तळणी, लोहगांव, किनाळा व रातिर्थ या गावातील प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या जमिनीचा वाढीव मोबदला देण्यासंबंधी निधी उपलब्ध करुन देण्याची मागणी कार्यकारी अभियंता, मध्यम प्रकल्प विभाग,नांदेड यांनी शासानाकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (१६-०३-२०१६) :(१) होय.

(२) महामंडळाकडील उपलब्ध अविशिष्ठ प्रकल्पाच्या निधीतून एकूण रु. ३७२.४० लक्ष च्या मागणीपैकी आतापर्यंत रु. २९९.९९ लक्ष जमिनीचा वाढीव मोबदला शेतकऱ्यांना अदा करण्यात आला आहे. उर्वरित मागणी निधीच्या उपलब्धतेनुसार देण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

कोल्हापूर जिल्ह्यातील गडहिंग्लज तालुक्याला जोडणा-या हिरण्यकेशी नदीवरील हारुर-गजरगाव बंधाऱ्याला पडलेले तडे बुजविण्याबाबत

(२३) ३२५७२ (२२-०१-२०१६). श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्ह्यातील गडहिंग्लज तालुक्याला जोडणा-या हिरण्यकेशी नदीवरील हारुर-गजरगाव बंधाऱ्याला मोठ्या प्रमाणात तडे पडल्यामुळे पाणी वाहून जात असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ च्या पहिल्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार हारुर-गजरगाव बंधाऱ्यातून पाण्याची गळती होवू नये म्हणून सदर बंधाऱ्याचे तडे बुजविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (१५-०३-२०१६) : (१) होय, अंशत: खरे आहे.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) १३ व्या वित्त आयोगांतर्गत को.प.बंधाऱ्याच्या विशेष दुरुस्तीस निधी प्राप्त झाला असुन सदर कामे मार्च २०१६ अखेर पुर्ण करण्याचे नियोजीत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

मराठवाड्यातील नवीन २५० हेक्टरवरील सिंचन प्रकल्पांना स्थगिती दिल्याबाबत

(२४) ३२७०३ (१२-०१-२०१६). श्री.हर्षवर्धन जाधव (कन्नड) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मराठवाड्यातील नवीन २५० हेक्टरवरील सिंचन प्रकल्पांना राज्य शासनाने स्थगिती दिली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मराठवाड्यातील दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासाठी पर्यायी कोणती उपाययोजना करण्यात आली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (१६-०३-२०१६) : (१) अंशत: खरे आहे.

मा.राज्यपाल महोदयांनी दिलेल्या सन २०१४-१५ च्या निदेशानुसार राज्य शासन चालू प्रकल्पावरील निधीच्या उपलब्धतेवर परिणाम न होऊ देता नवीन प्रकल्पांचे काम तीन वर्षात पूर्ण करण्याच्या दृष्टीने पुरेशी अतिरिक्त साधनसंपत्ती उपलब्ध करुन देत नाही, तोपर्यंत नवीन प्रकल्पांवर काम हाती घेण्यात येऊ नये. असे सूचित केले आहे.
(२) मराठवाढ्यातील टंचाईग्रस्त व आदिवासी भागाकरिता सिंचनाची सोय उपलब्ध करण्यासाठी प्रस्तावित २६ प्रकल्पांच्या योजनांचे मा.राज्यपाल महोदयांच्या सन २०१४-१५ च्या निदेशान्वये प्रकल्प घेण्यास मान्यता देण्याबाबत मा.मुख्यमंत्री यांनी त्यांचे दि. ०५ ऑगस्ट, २०१४ तसेच तद्नंतर पुन:श्च दि. १९ ऑगस्ट, २०१६ च्या पत्रान्वये मा.राज्यपाल महोदयांना विनंती करण्यात आली आहे.

२५० हेक्टर खालील प्रकल्प घेण्यास जलसंधारण विभागास मान्यता आहे. त्याप्रमाणे सन २०१४-१५ मध्ये मराठवाड्यात १६८५२ गावांची जलयुक्त शिवार अभियानांतर्गत निवड करण्यात आली आहे. त्यासाठी १६८.२ कोटी रुपये निधी तसेच ११२.३२ कोटी विशेषा निधी मंजूर केला आहे. सदर निवडलेल्या गावातील एकूण ६२४१८ कामांपैकी ३८७९७ कामे पूर्ण करण्यात आली असून २३९२१ कामे प्रगतिपथावर आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

कामशेत येथील इंद्रायणी नदीवरील बंधाऱ्यांची दुरवस्था झाल्याबाबत

(२५) ३२८९० (२१-०१-२०१६). श्री.संजय (बाळा) भेगडे (मावळ) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हा - मावळ तालुक्यातील कामशेत येथे शेतकऱ्यांना शेती व पिण्यासाठी मुबलक पाणी मिळावे, म्हणून शासनाने इंद्रायणी पात्रात २० वर्षापुर्वी १० लाख रुपये खर्च करुन कोल्हापूर पध्दतीचा बंधारा बांधला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या बंधाऱ्याच्या भिंती पडल्या असून, लोखंडी प्लेट पाण्यात पडल्या आहेत, त्यामुळे पाण्याची गळती मोठ्या प्रमाणात होत असून आगामी काळात २५ गावातील पाणीयोजना बंद पडण्याची शक्यता आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वडीवेळे धरणातून पाणी सोडल्यानंतर या बंधाऱ्यात पाणी राहत नसुन पुर्ण पाणी वाहुन जात आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, वडीवळे पाटबंधारे विभागाच्या वतीने सन २०१४-१५ अंतर्गत या बंधाऱ्याच्या दुरुस्तीसाठी खर्च रु. ७० लक्ष रुपयाचा प्रस्ताव सादर केला आहे काय,

(५) असल्यास, बंधाऱ्याची दुरुस्ती होण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (२२-०३-२०१६) : (१) होय.

(२) अंशत: खरे आहे.

(३) अंशत: खरे आहे.

(४) व (५) नाने-नाणोली को.प. बंधाऱ्याच्या रु १०३.०६ लक्ष किंमतीचा विशेष दुरुस्तीचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला असुन त्याची छाननी शासन स्तरावर सुरु आहे. छाननी अंती सदर प्रस्तावास प्रशासकीय मान्यता प्रदान करुन काम हाती घेण्याचे नियोजीत आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

अकोले (जि.अहमदनगर) तालुक्यातील निळवंडे धरणातील मुख्य कालवे व उच्चस्तरीय पाईप, कालव्याचे काम निधीअभावी अपूर्णावस्थेत असल्याबाबत

(२६) ३३०३६ (१५-०१-२०१६). श्री.वैभव पिचड (अकोले) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोले (जि.अहमदनगर) तालुक्यातील निळवंडे धरणाचे ९० टक्के काम पूर्ण झाले असतांना मुख्य कालवे व उच्चस्तरीय पाईप कालव्याचे काम निधीअभावी अपूर्ण आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती काय आढळून आले व तद् नुसार सदर धरणाचे अपूर्ण काम, मुख्य कालवे, उच्च स्तरीय पाईप कालव्याच्या कामास निधी उभारुन धरणाचे संपूर्ण काम करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (१८-०३-२०१६) : (१) खरे आहे.

(२), (३) व (४) उपलब्ध निधीनुसार काम करण्यात येत आहे.

हिंगोली व वाशिम जिल्ह्याच्या सीमेवरील पैनगंगा नदीवरील बॅरेजेसची कामे अपूर्णावस्थेत असल्याबाबत

(२७) ३३१०८ (१५-०१-२०१६). श्री.तानाजी मुटकुले (हिंगोली), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशिम जिल्ह्यातील पैनगंगेवरील बॅरेजच्या कामांना सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात आली नसल्यामुळे दरवर्षी १० टक्के याप्रमाणे ४७७ कोटी रुपयांच्या तीन वर्षापूर्वीच्या प्रस्तावित खर्चात सुमारे १४३.१३ कोटी रुपयांची वाढ झाली असल्यामुळे आता या प्रकलपावरील खर्चाचा आकडा ६२० कोटी ३२ लाख रुपयांवर पोहोचला असल्याचे दिनांक ११ ऑक्टोबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) हिंगोली व वाशिम जिल्ह्याच्या सीमेवरुन वाहणाऱ्या पैनगंगा नदीवरील बॅरेजेसची कामे अपूर्ण असल्यामुळे यावर्षी पाणी साठा होऊ शकला नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर बॅरेजेसची केवळ १० ते २० टक्के उर्वरित कामे अपूर्णावस्थेत असण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत व उर्वरित कामे किती कालावधीत पूर्ण होतील,

(४) असल्यास, पैनगंगा बॅरेजेसची कामे पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (१६-०३-२०१६) : (१) सदर प्रकल्पांना रु. ७१६.४२ कोटी या किंमतीस शासन निर्णय क्र. संकिर्ण २२१५/(२८६/२०१५)/लपा-२, दि.१२.०१.२०१६ अन्वये सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

(२) अंशत: खरे आहे.

वाशिम जिल्ह्यातील पैनगंगा नदीवरील ११ बॅरेजेसपैकी तीन बॅरेजेस (अडगाव, कोकलगाव, गणेशपूर) जून, २०१५ मध्ये पूर्ण करुन ९.६६१ द.ल.घ.मी. पाणीसाठा करण्यात आला असून अंशत: सिंचन क्षमता निर्मिती केली आहे.

(३) व (४) सुधरित प्रशासकीय मान्यतेअभावी बॅरेजेसची कामे प्रलंबित होती. शासन निण्रय दि. १२.०१.२०१६ अन्वये सुप्रमा दिलेली आहे. उर्वरित आठ बॅरेजेसची कामे सन २०१६-१७ मध्ये पूर्ण करुन २३.६० दलघमी पाणीसाठा निर्माण करण्याचे नियोजन आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

दर्यापूर मतदारसंघातील चंद्रभागा, वाघाडी, सामदा, खिरकुंड बॅरेजेस व धरणाचे काम अपूर्णावस्थेत असल्याबाबत

(२८) ३३७४५ (२०-०१-२०१६). श्री.रमेश बुंदीले (दर्यापूर) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दर्यापूर मतदारसंघातील चंद्रभागा, वाघाडी, सामदा, खिरकुंड बॅरेजेस व धरणाचे काम अपूर्णावस्थेत असून त्यामुळे शेतकऱ्यांना ओलीताची सोय उपलब्ध होत नाही, पर्यायाने उत्पन्नात घट होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निधी उपलब्ध करुन देण्याबाबत लोकप्रतिनिधींनी दिनांक १८ मार्च, २०१५ रोजी वा त्यासुमारास मा.जलसंपदा मंत्री यांच्याकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरील अपूर्णावस्थेत स्थितीतील बॅरेजेस व धरणाचे काम पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (१५-०३-२०१६) : (१) होय, हे अंशत: खरे आहे. अंजनगांव सुर्जी तालुक्यातील खेरकुंड प्रकल्पाचे काम सन २००२-०३ मध्ये पूर्ण झालेले असून, प्रकल्पाची ८४६ हे. सिंचन क्षमता निर्मीत झाली असून, शेतकऱ्यांना सिंचनाच्या सोई उपलब्ध आहेत. तथापि, चंद्रभागा, वाघाडी, सामदा सौंदडी या तीन प्रकल्पाची बांधकामे प्रगतीपथावर आहेत. कामे पूर्ण झाल्यावर लाभधारक शेतकऱ्यांना ओलीताच्या सोई उपलब्ध होणार आहेत.

(२) होय.

(३) प्रकल्पावर बांधकामासाठी पुरेसा निधी उपलब्ध आहे.

अपुर्णावस्थेतील प्रकल्प पुर्ण करण्यास्तव प्रकल्पांचे सुधारीत प्रशासकीय मान्यता (सुप्रमा) प्रस्ताव राज्य तांत्रिक सल्लागार समितीकडे सादर करण्यात आले आहेत.

याशिवाय भुसंपादनाबाबत जिल्हाधिकारी, यांचेकडे तसेच प्रकल्पांमुळे बांधीत रस्ते व पुलाचे बांधकामासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे पाठपुरावा क्षेत्रिय स्तरावर करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

कृष्णा खोरे अंतर्गत असलेली राज्यस्तरीय कोल्हापूरी पध्दतीचे बंधारे उच्चस्तरीय बंधाऱ्यामध्ये रुपांतरीत करण्याबाबत

(२९) ३३७९० (२०-०१-२०१६). श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कृष्णा खोरे अंतर्गत असलेली राज्यस्तरीय कोल्हापूरी पध्दतीचे बंधारे उच्चस्तरीय बंधाऱ्यामध्ये (बॅरेज) रुपांतरीत करण्याबाबत उमरगा-लोहारा येथील लोकप्रतिनिधींनी मा.जलसंपदा मंत्री, यांना दिनांक १३ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाद्वारे विनंती केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (१५-०३-२०१६) : (१) हे खरे आहे.

(२) सद्य:स्थितीत नवीन प्रकल्प हाती न घेण्याचे मा. राज्यपाल महोदयांचे निर्देश आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

निम्न तापी प्रकल्प (पाडळसरे) या प्रकल्पास निधी मिळण्याबाबत

(३०) ३४८३३ (१४-०१-२०१६). श्री.चंद्रकांत सोनावणे (चोपडा) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तापी खोऱ्यातीत निम्न तापी प्रकल्प (पाडळसरे) या प्रकल्पाला सन १९९५-९६ मध्ये प्रशासकीय मान्यता देते वेळी या प्रकल्पाचा खर्च १४२ कोटी रुपये इतका होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २००८-०९ च्या प्रशासकीय मान्यतेनुसार हा खर्च रु.११२७ कोटी पर्यंत पोहोचला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, काम संथगतीने केले गेल्याने धरणाचा खर्च वाढला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकल्पाची जळगाव जिल्हयातील सिंचन क्षमतेने अमळनेर पारोळा चोपडा व धरणगांव तालुक्यातील ६०१३९ हेक्टर तर धुळे जिल्हयात ३५१७ हेक्टर एवढे क्षेत्र भिजले जाणार आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या प्रकल्पाची जलदगतीने काम पाच वर्षात पूर्ण करण्यासाठी शासनाकडून दरवर्षी दोनशे कोटी रुपयाची गरज असताना सन २०१५-१६ मध्ये कमी तरतूद केली गेली, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, या मुळे या प्रकल्पाचे काम संथगतीने होऊन प्रकल्प खर्चात वाढ होऊ नये यासाठी निम्न तापी प्रकल्पासाठी जास्तीत जास्त निधी मंजूर करुन प्रकल्पाचे काम जलदगतीने पूर्ण करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (१८-०३-२०१६) : (१) होय. प्रकल्पाची सन १९९५-९६ च्या दरसुची नुसार प्रशासकिय मान्यता किंमत रु.१४२.६४ कोटी होती.
(२) होय. सन २००८-०९ च्या दरसुची नुसार प्रकल्पाची तृतीय सुधारीत किंमत रु.११२७.७४ कोटी आहे.
(३) भुसंपादन, पुनर्वसन याकरीता लागणारा कालावधी व निधी उपलब्धते नुसार प्रकल्प पुर्णत्व कालावधीत वाढ होत आहे.

जमिनीचे किंमतीत होणारी वाढ, गौण खनिज स्वामित्व शुल्कात होणारी वाढ, व्याप्तीतील बदल, सविस्तर, संकल्पनानुसार झालेली परिमाणातील वाढ, दरसूचीतील वाढ यामूळे किंमतीत वाढ होत आहे.
(४) निम्न तापी प्रकल्पाचे जळगांव जिल्ह्यातील पिक क्षेत्र ५१९०१ हे. व धुळ जिल्ह्यातील पिक क्षेत्र ३०३५ हे. इतके क्षेत्र आहे.
(५) सन २०१५-१६ मध्ये निम्न तापी प्रकल्पास रु.२०.०० कोटी निधी प्राप्त झाला असून सदरचा निधी खर्च झाला आहे.
(६) राज्यात सिंचनाचा समतोल विकास होण्याच्या दृष्टीने मा.राज्यपाल महोदयांच्या निर्देशानुसार जलसंपदा विभागास प्राप्त हेणाऱ्या निधीचे विविध सिंचन महामंडळामध्ये वाटप केले जाते. यानुसार तापी महामंडळास प्राप्त होणाऱ्या निधीतून प्रकल्पाचे काम हाती घेण्यात येत आहे.
(७) प्रश्न उद्भवत नाही.

अमरावती जिल्ह्यातील चांदी प्रकल्पवासियांचे हिवरा (मुरादे) येथे पुनर्वसन केले असता पुनर्वसनाचे रोड व नालीचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे असल्याबाबत

(३१) ३४९२१ (२०-०१-२०१६). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमरावती जिल्ह्यातील चांदी प्रकल्पवासियांचे वडाळा व फत्तेपुर गावांतील नागरिकांचे शासनाने हिवरा (मुरादे) येथे पुनर्वसन केले असून हे पुनर्वसन करतांना संबंधितांना सर्वसुखसोयी दिल्या जातील असे सांगण्यात आले होते वास्तविक पुनर्वसनाच्या ठिकाणी हिवरा येथे गेले असतात पुनर्वसनाचे रोड व नालीचे बांधकाम अत्यंत निकृष्ट दर्जाचे झाल्याने

पावसाळ्यात त्या ठिकाणी सांडपाणी साचत असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कारणास्तव नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला असून वारंवार विद्युत पुरवठा देखील खंडित होत असल्यामुळे नागरिकांची गैरसोय होत असल्याने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (२२-०३-२०१६) : (१) अंशत: खरे आहे.

चांदी प्रकल्पांतर्गत वडाळा फत्तेपूर गावाचे पुनर्वसन हिवरा मुरादे येथे करण्यात आले आहे. पुनर्वसित गावठाणातील रस्त्याची नाली संधानकाच्या आवश्यक मागण्या घेण्यात आल्या असून ५१०० पैकी ९०० मी. नाल्याची बांधकामे अपेक्षित दर्जा प्राप्त न झाल्यामुळे याकरीता कंत्राटदाराची देयकाची रक्कम राखून ठेवण्यात आली आहे.

(२) नाल्यामधील सांडपाणी हे गावठाणामध्ये थांबत नाही. गावठाणातील पावसाचे पाणी हे लगतच्या जिल्हा मार्ग रस्त्याचे बाजुचे गटरमध्ये जमा होत असून या गटरला योग्य उतार नसल्याने पावसाचे पाणी काही कालावधीसाठी जिल्हा मार्गाच्या गटरध्ये थांबलेले असते. गटरला लागुन घरे नसल्याने आरोग्याचा प्रश्न निर्माण झाल्याचे दिसून येत नाही.

पावसाळी वातावरणात लांब वीजांच्या कडकटांमुळे व इतर कारणांमुळे विद्युत वाहिनीत ऑगस्ट महिन्यामध्ये दि. ०७.०८.२०१५ व दि. १०.०८.२०१५ रोजी बिघाड निर्माण होऊन अनुक्रमे ४ तास २० मिनीट व २ तास १० मिनीट या कालावधीकरिता विद्युत पुरवठा बंद होता. सदर दोष निराकरण करुन विद्युत पुरवठा पूर्ववत करण्यात आला होता.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

कोल्हापूर जिल्ह्यातील करंबळी, म्हसवे, निष्णप, आकुर्डे, शिरगाव, तारळे, धामोड या बंधाऱ्यांची झालेली दुरवस्था

(३२) ३५३५८ (२०-०१-२०१६). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्ह्यातील करंबळी, म्हसवे, निष्णप, आकुर्डे, शिरगाव, तारळे, धामोड, या बंधाऱ्यांची पडझड झाल्यामुळे शेतीसाठी पाणी आडवीणे कठीण झाले असून पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतीचे व पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडवून दुष्काळाला सामोरे जात असताना सदरील केटीवेअरच्या दुरुस्तीसाठी तात्काळ निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (१५-०३-२०१६) : (१) व (२) अंशत: खरे आहे.

कोल्हापूर जिल्ह्यातील म्हसवे को. प. बंधारा सुस्थितीत असुन आवश्यकतेनुसार नविन लोखंडी बर्गे घेऊन पूर्ण क्षमतेने पाणीसाठा करण्याचे नियोजीत आहे. करंबळी, आकुर्डे- गारगोटी व शिरगांव को. प. बंधाऱ्याच्या विशेष दुरुस्ती कामांना प्रशासकिय मान्यता प्रदान करण्यात आली असून आवश्यकते नुसार निधी उपलब्ध करुन कामे पूर्ण करण्याचे नियोजीत आहे. तारळे व धामोड बंधाऱ्यांच्या विशेष दुरुस्तीसाठी प्रशासकिय मान्यतेचे प्रस्ताव तयार करणेची कार्यवाही क्षेत्रिय स्तरावर चालु आहे. निष्णप हा बंधारा नसुन तो जलसंधारण विभागाकडील ल.पा. प्रकल्प आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

कोल्हापूर जिल्ह्यातील राधानगरी व काळम्मावाडी या धरणावरील कामासाठी कर्मचाऱ्यांची खाजगी कंत्राटी पद्धतीने नियुक्ती करण्याबाबत

(३३) ३५३६४ (२०-०१-२०१६). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्ह्यातील राधानगरी व काळम्मावाडी या धरणावर अनेक वर्षे कार्यरत असणारे कर्मचारी निवृत्त झाल्यामुळे धरणावरील कामकाजाकरिता आवश्यक कर्मचारी कमतरता भासत आहे यामुळे धरण परिसराची सुरक्षितता धोक्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, धरणाच्या सुरक्षिततेसाठी व इतर अनुषंगिक कामासाठी खाजगी कंत्राटी पद्धतीने कर्मचाऱ्यांच्या नियुक्ती करून सदर परिसराच्या सुरक्षेसाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (१५-०३-२०१६) : (१) हे अंशत: खरे आहे.

(२) दोन्ही धारण क्षेत्रावर देखभालीच्या सुरक्षिततेसाठीच्या बंदोबस्ताकरिता पोलीस सुरक्षा नेमण्यात आलेली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

मानागड (जि.गोंदिया) मध्यम प्रकल्पासाठी निधी मिळण्याबाबत

(३४) ३५४०३ (२०-०१-२०१६). श्री.संजय पुराम (आमगाव) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मानागड (जि.गोंदिया) मध्यम प्रकल्पासाठी लागणाऱ्या निधीसाठी जलसंपदा विभागाकडे बऱ्याचदा निवेदन दिलेले आहे, परंतु अजुनपर्यंत कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे निधी अभावी सदर प्रकल्पाचे काम प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर निधी अभावी प्रलंबित असलेल्या प्रकल्पाचे काम कधीपर्यंत पुर्णत्वास येणार आहे,
(४) असल्यास, सदर काम तातडीने पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (१६-०३-२०१६) : (१), (२), (३) व (४) च्या विशेष दुरुस्ती प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देण्याची कार्यवाही चालू आहे. प्रशासकीय मान्यता प्रदान केल्यानंतर निधीची तरतूद करुन सदरचे काम पूर्ण करण्याचे नियोजन आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

नाशिक जिल्ह्यातील द्राक्षबागा वाचविण्याबाबत

(३५) ३५६६७ (२०-०१-२०१६). श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक जिल्ह्यातील गंगापूर धरण समूहात १०८६ द.ल.घ.फू. पाणीसाठा शिल्लक असून या भरवशावर २५ हजार एकर बागा उभ्या असल्याने सद्यस्थितीत पाणी ऊसाला देणे अन्यायकारक आहे, यामुळे द्राक्षबागा वाचविण्याबाबत शासनाने कार्यवाही करावी याबाबत येथील शेतकऱ्यांनी संबंधित विभागाकडे माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निवेदन दिले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गंगापूर व आळंदीतून पाणी सोडल्यास ते जायकवाडीपर्यंत पोचणारसुध्दा नाही, त्यामुळे शासनाने या निर्णयाचा फेरविचार करावा अशी मागणी निवेदनात केली आहे, हे ही खरे आहे काय ,
(३) असल्यास, उक्त निवेदनावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (१५-०३-२०१६) : (१) होय.

गंगापूर धरणसमुहातील पाणी जायकवाडी प्रकल्पासाठी न सोडता याच धरणसमूहाच्या लाभक्षेत्रातील द्राक्ष फळबागांना मिळावे अशा आशयाची मागणी असलेली दि. १२/१०/२०१५, दि. १७/१०/२०१५ व दि. १९/१०/२०१५ रोजीची निवेदने जिल्हाधिकारी, नाशिक यांना प्राप्त झालेली आहेत.
(२) अंशत: खरे आहे.

जायकवाडी प्रकल्पासाठी गंगापूर धरण समुहातून पाणी सोडण्याच्या निर्णयाचा फेर विचार करावा असे सदरील निवेदनांमध्ये सूचीत करण्यात आले आहे.

(३) जायकवाडी प्रकल्पासाठी गंगापूर धरण समुहासह इतर धरणसमुहातून पाणी सोडण्याचे महामंडळ कार्यालयाचे दि. १७ ऑक्टोबर, २०१५ रोजीचे आदेश हे महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाच्या दि. १९ सप्टेंबर, २०१४ च्या निवाड्यानुसार आहेत. या निवाड्यातील कलम १०(जे) नुसार समन्यायी पाणी वाटपाची जबाबदारी कार्यकारी संचालक यांची आहे. महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण ही अर्धन्यायीक स्वरुपाची यंत्रणा आहे. "महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम २००५" या कायद्यानुसार प्राधिकरणाने दिलेल्या आदेशांचे पालन न झाल्यास कायद्याच्या कलम २६ नुसार दंडात्मक कार्यवाहीची तरतूद आहे. त्यामुळे जायकवाडीच्या उर्ध्व भागातील धरण समुहातून जायकवाडीच्या नाथसागर जलाशयात पाणी सोडण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

सदरहू प्रकरणी मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे विविध याचिका दाखल करण्यात आल्या असुन त्या संदर्भातील सुनावण्या सुरु आहे. न्यायालयीन निर्णयाच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही करणे नियोजित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

रायगड जिल्ह्यातील बाळगंगा धरण संघर्ष व पुनर्वसन समितीच्या वतीने चरसई विभाग पेण जि.रायगड यांच्या निवेदनातील मागण्यांबाबत

(३६) ३५७१४ (२०-०१-२०१६). श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्यातील बाळगंगा धरण संघर्ष व पुनर्वसन समितीच्या वतीने चरसई विभाग पेण जि.रायगड यांच्यावतीने दिनांक ५ ऑगस्ट, २०१५ रोजी मा.जलसंपदा व जलसंधारण, राज्यमंत्री यांना निवेदन देण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संघर्ष समितीने आपल्या निवेदनात कोणकोणत्या मागण्या केल्या आहेत,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीअंती काय आढळून आले,

(४) असल्यास, निवेदनातील मागण्याबाबत शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (१९-०३-२०१६) : (१) होय.

बाळगंगा धरण संघर्ष व पुनर्वसन समिती, वरसई विभाग, ता. पेण जि.रायगड यांनी दि. १८.८.२०१५ रोजी मा. राज्यमंत्री, जलसंपदा व जलसंधारण यांना निवेदन दिलेले आहे.

(२) संघर्ष समितीने निवेदनात एकूण १४ मागण्या केलेल्या असून प्रामुख्याने सिडकोच्या अन्य प्रकल्पातील तरतुदीनुसार या प्रकल्पातही सिडकोने काही प्रमाणात भागीदारी दयावी आणि विकसित भूखंड व नोकरी अथवा पॅकेज द्यावे इ. मागण्या केल्या आहेत.

(३) व (४) सदर निवेदनाचे अनुषंगाने दि. २३.९.२०१५ रोजी मा. राज्यमंत्री (जलसंपदा व जलसंधारण) यांचे अध्यक्षतेखाली बाळगंगा प्रकल्पग्रस्तांच्या समस्याबाबत बैठक संपन्न झाली.

शासनाच्या प्रचलित भूसंपादन व पुनर्वसनाच्या तरतूदीनुसार या प्रकल्पाबाबत करण्यात येईल. भूसंपादनासाठी महसूल विभागाकडे रु. ५९९.९३ कोटी निधी वर्ग केलेला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

नागपूर जिल्ह्यात दुषित पाण्याचा पाणी पुरवठा होत असल्याबाबत

(३७) ३६२६८ (१४-०१-२०१६). डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपुर जिल्हा परिषदेकडून दोनदा पिण्याचे नमुने तपासण्यात येतात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हा परिषद, नागपूरकडून माहे एप्रिल, २०१५ मध्ये ६,५५१ नमुने तपासण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, यामध्ये ४ ग्रामपंचायत नरखेड तालुक्यातील लोहारी, सांवगा, घोगरा, काटोल तालुक्यातील कलम, कळमेश्वर तालुक्यातील अदास या ग्रामपंचायतीच्या जलजन्य आजाराची लागण झाली आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, ग्रामसेवकांनी कर्तव्यात कसूर केलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या ग्रामसचिवाविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे (२३-०५-२०१६) :(१) जिल्हा परिषदेकडून चार वेळा पाण्याचे नमुने तपासण्यात येतात.

(२) नाही. जिल्हा परिषदेकडून माहे एप्रिल, २०१५ मध्ये २१५१ पाण्याच्या स्त्रोतांचे नमुने तपासण्यात आले आहेत.

(३) हे खरे नाही.

(४) नाही.

(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

जत (जि.सांगली) येथील कृष्णा नदीचे पाणी नेण्यासाठी सुरु केलेली म्हैसाळ उपसा सिंचन योजना अपूर्णावस्थेत असल्याबाबत

(३८) ३६४५० (१४-०१-२०१६). श्री.विलासराव जगताप (जत) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जत (जि.सांगली) तालुक्यासाठी कृष्णा नदीचे पाणी नेण्यासाठी सुरु केलेली म्हैसाळ उपसा सिंचन योजनेची कामे पूर्ण करण्यासाठी शासन स्तरावर सन २०१४-२०१५ सालासाठी किती निधीची उपलब्धता करण्यात आलेली आहे,

(२) असल्यास, सदर निधी वाटप करण्यात आला आहे काय व अद्यापपर्यंत निधी वाटप न करण्याचे कारणे काय आहेत,
(३) असल्यास, निधी अभावी सदर काम बंद आहे, हे ही खरे आहे,
(४) लायनिंग न करता मुख्य कॅनॉल व त्यावरील बांधकाम पूर्ण करण्यासाठी किती निधी लागेल,
(५) असल्यास, त्याची पुर्तता होईल काय तसेच अंकले व खलाटी पंप हाऊसचे काम सुरु करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

श्री. गिरीष महाजन (१९-०३-२०१६) : (१) व (२) कृष्णा कोयना उपसा सिंचन योजनेसाठी सन २०१४-१५ मध्ये रु. १४२ कोटी ची तरतुद करण्यात आली होती. केंद्र शासनाने निधी उपलब्ध केला नाही. राज्य शासनाने आपल्या हिश्याची रु. ३५.५७ कोटी इतकी तरतुद वितरीत केली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) म्हैसाळ उपसा सिंचन योजनेअंतर्गत लायलिंग (अस्तरीकरण कामे) न करता मुख्य कालवा व त्यावरील बांधकामे पूर्ण करण्यासाठी रु. २७२.०१ कोटी इतक्या निधीची आवश्यकता आहे.
(५) सदर पंपगृहांसाठी आवश्यक भू-संपादनाची प्रगतीपथावर कार्यवाही असून निधीच्या उपलब्धतेनुसार या योजनेचे काम पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

पुणे जिल्ह्यातील भामा आसखेड धरण कालव्याचे बांधकाम प्रलंबित असल्याबाबत

(३९) ३६५९८ (२०-०१-२०१६). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे जिल्ह्यातील आसखेड धरण पूर्ण होवूनही १५ वर्षे झाली तरी अद्यापि कालवे बांधण्यात न आल्याने २३ हजार हेक्टर जमिनीला सिंचन उपलब्ध झालेले नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सिंचनासाठी बांधण्यात आलेल्या या धरणातील पाणी पुणे शहरात देण्याचा निर्णय शासनाने घेतला, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, पुणे शहरात पाणी देण्यास स्थानिक नागरिकांनी दिनांक १५ ऑक्टोबर २०१५ रोजी वा त्या सुमारास मोठा विरोध केला होता, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, या धरणाच्या कालव्यांचे बांधकाम पूर्ण करुन या भागातील शेतक-यांना पाणी सिंचनासाठी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (२३-०३-२०१६) : (१) अंशत: खरे आहे.
धरण पूर्ण होऊन ५ वर्षे झाली आहेत. प्रकल्पाच्या नियोजित लाभक्षेत्रात मोठ्या प्रमाणात नागरीकरण झाल्याने भूसंपादनास अडचणीमूळे कालव्याची कामे अपूर्ण राहीली आहेत.

(२) होय, पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका, चाकण व लगतच्या १९ गावांना पिण्यासाठी पाणी देण्याबाबत शासनाने निर्णय घेतला आहे.

(३) होय.

(४) सदरील प्रकल्पातून पिण्याच्या प्रयोजनार्थ आवश्यकतेनुसार १४१.१८६ दलघमी बिगर सिंचन पाणी आरक्षण मंजूर करण्यात आले असल्याने प्रकल्पाचे सुधारित जलनियोजन करुन कालव्याच्या कामांचे पुर्नविलोकन करण्याची कार्यवाही प्रगतीत आहे. भामा आसखेड प्रकल्पाच्या लाभक्षेत्रातील लाभधारकांच्या व लोकप्रतिनिधींच्या मागण्यानुसार प्रकल्पाच्या २३११० लाभक्षेत्रांपैकी १९६४५ हे. लाभक्षेत्र वगळण्यात आले आहे. प्रकल्पातील निर्मित पाणीसाठा सद्य:स्थितीत धरणाच्या निम्न बाजुकडील को.प. बंधाऱ्यात सोडून खाजगी उपसा सिंचनाद्वारे व जलाशय उपसाद्वारे वापरण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

पेण तालूक्यातील खार लाँडं विभागाच्या दुर्लक्षामुळे ६०० एकरहून अधिक जमीनी समुद्राच्या उधाणाचे पाणी शिरल्यामुळे नापीक होत असल्याबाबत

(४०) ३६६२५ (२०-०१-२०१६). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.विजय काळे (शिवाजीनगर) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पेण (जि.रायगड) तालूक्यातील खारलाँडं विभागाच्या दुर्लक्षामुळे ६०० एकरहून अधिक जमीनी समुद्राच्या उधाणाचे पाणी शिरल्यामुळे नापीक झाल्याचे माहे नोव्हेंबर २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त तालूक्यातील खाडी किनारी असणाऱ्या विठ्ठलवाडी, भाल, वढाव, कान्होबा, सारेभाग, वावे, वडखळ, कोळवे, बेनेघाट, आनंदनगर, जुई आदि गावात भात शेतीत समुद्राच्या उधाणाचे पाणी शिरल्याने शेतकऱ्यांच्या शेतपिकांचे मोठ्याप्रमाणात नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पंचक्रोशी प्रकल्पग्रस्त शेतकरी संघातर्फे मागणी करून सुद्धा खारलँड विभागाने वेळीच बांध न घातल्यामुळे भात शेतीत समुद्राच्या उधाणाचे पाणी शिरल्याने जमीप नापीक झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणामध्ये दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (१५-०३-२०१६) : (१) नाही.

खारभूमी विभागाच्या दर्लक्षामुळे नाही तर, दिनांक २७ ऑक्टोंबर, २०१५ व २७ नोव्हेंबर, २०१५ रोजी आलेल्या मोठ्या उधानामुळे पेण तालुक्यातील २६ खारभूमी योजनाच्या बांधाना मोठ्या प्रमाणात खांडी पडून क्षेत्रामध्ये खारेपाणी शिरले होते.

(२) पेण तालुकयातील नारवेल बेनवले खारभूमी योजना अंतर्गत असलेल्या विठ्ठलवाडी भाल, वढाव, कान्होबा या गावातील लाभक्षेत्रामध्ये खारे पाणी शिरले होते.

बोरी या खाजगी योजनेलगत खांडी पडून सदर खाजगी योजनेच्या अंतर्गत असलेल्या कोळवे, बेनेघाट या गावातील क्षेत्रामध्ये खारे पाणी शिरले होते. बोरी ही खाजगी योजना असल्यामुळे त्या योजनेचे काम शासनामार्फत करण्यात येत नाही. शेतामधील भात पिकाचे नुकसानबाबत कृषीखाते व महसूल खात्यामार्फत पाहणी करण्यात आली आहे.

(३) शासकीय खारभूमी योजना वाशी ओढांगी, वावे वडखळ या योजनांच्या झालेल्या नुकसानीची दुरुस्ती लाभधारकाच्या सहाय्याने तातडीने हाती घेऊन क्षेत्र बाधीत होणार नाही याची दक्षता घेण्यात येत आहे. नारवेल बेनवले खारभूमी योजनेचे काम राष्ट्रीय चक्रीवादळ धोके निवारण प्रकल्पा अंतग्रत समाविष्ट आहे. मान्यतेनंतर योजनेचे काम हाती घेण्यात येईल.

(४) क्षेत्रीय स्तरावर आवश्यक कार्यवाही केली असल्यामुळे प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

चंद्रपुर जिल्ह्यातील राजुरा तालुक्यातील बल्लारपुर क्षेत्राअंतर्गत पोवणी खदान २ व ३ इरावती प्रकल्पासाठी साखरी नाल्याचा प्रवाह गोवरी नाल्यात वळती करण्याबाबत

(४१) ३६६७५ (१५-०१-२०१६). ॲड.संजय धोटे (राजूरा) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपुर जिल्ह्यातील राजुरा तालुक्यातील बल्लारपुर क्षेत्राअंतर्गत पोवणी खदान २ व ३ इरावती प्रकल्पासाठी साखरी नाल्याचा प्रवाह गोवरी नाल्यात वळती करण्याची योजना वे.को.ली. शासनाकडून आखण्यात आल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर नाल्याचा नैसर्गिक प्रवाह बदलवून गोवरी नाल्याला जोडल्यास गोवरी वासीय व शेतकऱ्यांना बॅक वॉटरच्या त्रासासोबत शेतीचे नुकसान ही सहन करावे लागणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, गावकरी व शासनाला विश्वासात न घेता सदर प्रकल्पाचे नियोजन होत असल्याने गावकऱ्यांनी आंदोलन करुन वे.को.ली. शासनाबद्दल नाराजी व्यक्त केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने यावर कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (०७-०३-२०१६) : (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

खुजगाव (ता.शिराळा, जि.सांगली) येथील वारणा नदीवरील उजव्या कालव्याला गळती लागल्याने शेतजमिनी नापिक झाल्याबाबत

(४२) ३६७६२ (१५-०१-२०१६). श्री.शिवाजीराव नाईक (शिराळा) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खुजगाव (ता.शिराळा, जि.सांगली) येथील वारणा नदीवर उजव्या कालव्याच्या जलसेतूला मागील दीर्घकाळ गळती लागली असल्याने त्या परिसरातील शेतजमिनी नापिक बनल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या कालव्याची गळती थांबविण्याच्या दृष्टीने दुरुस्ती करण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, अद्याप काहीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास या दुर्लक्षाला पाटबंधारे विभागाच्या जबाबदार अधिका-यांविरुध्द काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, या परिसरातील शेतकऱ्यांना न्याय देण्याच्या दृष्टीने शासन किती कालावधीत दुरुस्तीची कार्यवाही करणार आहे ?

श्री. गिरीष महाजन (२३-०३-२०१६) : (१) हे खरे नाही.

(२) सदर जलसेतुच्या दुरुस्ती कामासह, वारणा उजवा कालवा कि.मी. १ त १२ मध्ये जिओसिंथेटिक अस्तरीकरण उपाययोजनाकरणेच्या कामाची स्वीकृत निविदा किंमत रु. २५३३.९२ लक्ष इतकी आहे. सदर दुरुस्तीची कामे वारणा प्रकल्पास होणाऱ्या अर्थसंकल्पीय तरतुदीतून उपलब्ध होणाऱ्या या निधीतून करण्याचे नियोजन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) उपरोक्त कामाचा मूळ कालावधी २४ महिने इतका असून सदर कामास आता दि. २३.०८.२०१६ पर्यंत द्वितीय मुदतवाढ देण्यात आली आहे.

शेतकऱ्यांना सम न्यायी पाणी वाटप व योग्य पाणीपट्टी घेऊन त्यांच्या हक्काचे पाणी देण्याबाबत

(४३) ३६७८३ (२०-०१-२०१६). श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सम न्यायी पाणी वाटप कायदा २००५ रोजी मंजूर झाला त्यावेळी एमडब्ल्यूआरआरए (MWRRA) नुसार एमएमआयएसएफ (MMISF) प्रमाणे पाणी वाटप संस्था स्थापन करण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर संस्था सद्यस्थितीत शेतकऱ्यांना सम न्यायी पाणी वाटप व योग्य पाणीपट्टी घेऊन त्यांच्या हक्काचे पाणी देत नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार सदरहू संस्था बरखास्त करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (२३-०३-२०१६) : (१) महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण कायदा २०१५ (MWRRA Act) व महाराष्ट्र सिंचन पध्दतीचे शेतकऱ्यांकडून व्यवस्थापन कायदा २००५ (MMISF Act) हे दोन्ही कायदे सन २००५ मध्ये पारित झाले असून एमएमआसएसएफ या कायद्यांतर्गत पाणी वापर संस्था स्थापन करण्यात आल्या आहेत, हे खरे आहे,
(२) हे खरे नाही.
(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

सारंगपूरी येथे मुमरीधरण प्रस्तावित करताना धरणग्रस्थांचे पुनर्वसन करण्याबाबत

(४४) ३७८६४ (२२-०१-२०१६). श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शहापूर (जि.ठाणे) येथे सन १९६९ साली भातसा धरणाच्या उभारणीवेळीच सारंगपूरी येथे मुमरीधरण प्रस्तावित केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, १०४ गावांचे पुनर्वसन व संपादित जमिनीचे विविध लाभ शेतकऱ्यांना मिळण्याआधीच प्रस्तावित मुमरी धरणाची १६७ कोटींची निविदा मंजूर करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, पाच वर्षे उलटून, ठेकेदार नेमून यासाठी केंद्रीय वने व पर्यावरण विभागाची यासाठी मान्यताच घेतली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) तसेच सदर धरणामुळे बाधित होणाऱ्या धरणग्रस्थांचे पुनर्वसन करण्यात आलेले नाही, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (१८-०३-२०१६) : (१) नाही.
शासनाने जून १९६७ मध्ये भातसा प्रकल्पास प्रशासकीय मान्यता दिली आहे. यामध्ये मुमरी धरणाच समावेश नव्हता. तथापी डिसेंबर १९८३ मध्ये दिलेल्या तृतीय प्रशासकीय मान्यता अहवालात मुमरी धरणाचा समावेश आहे.
(२) अंशत: खरे आहे.
मुमरी धरणाचे बुडीत क्षेत्रामुळे १०४ गांवे बाधीत नसून फक्त ४ गांवे बाधीत होत आहेत त्यामध्ये मौ.कोठारे ग्रामपंचायती अंतग्रत अवकलपाडा (२९ घरे) आणि सारंगपूरी ग्रामपंचायती अंतग्रत चाफ्याचा पाडा (५ घरे) अशी दोन गांवातील ३४ घरे बाधीत होत आहेत. तसेच खैरे व जुनवणी येथील फक्त जमीन बाधीत होत आहे.
मुमरी धरणाची रु.१७३.०३ कोटीची निविदा स्वीकृत करुन सुधारीत कार्यारंभ आदेश दि.१४/२/२०१३ रोजी दिलेले आहेत.
(३) नाही.

मुमरी धरणाच्या ४१२.१३५ हे. वनजमिन प्रस्तावास केंद्र शासनाची तत्वत: मान्यता घेण्यासाठी दि.२०.५.२००५ शासनाची तत्वत: मान्यता घेण्यासाठी दि. २०.५.२००५ रोजी सादर केला होता त्यास दि.२/३/२००९ रोजी तत्वत: मान्यता मिळाली असून अंतिम मान्यता दि.०२/०५/२०१४ रोजी प्राप्त झाली आहे.

पर्यावरण मान्यतेसाठी राज्य शासनाच्या समितीसमोर सादरीकरण होऊन दि.२९/१/२०१६ रोजी अंतिम मान्यतेसाठी शिफारस केली आहे.

(४) होय.

(५) प्रकल्पग्रस्ताचे सहमतीने मौजे साजिवली येथे पुनर्वसन प्रस्तावित आहे. प्रकल्पाचे पुनर्वसन झाले नंतरच धरणात पाणीसाठा करणेत येईल. धरणाचे कामांस अद्यापित सुरुवात केलेली नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

जामनाला व अयडापूर (जि.यवतमाळ) प्रकल्पाचे काम पुर्ण होवून प्रकल्पाच्या वितरीकाचे काम प्रलंबित असल्याबाबत

(४५) ३७९४६ (२२-०१-२०१६). श्री.राजेंद्र नजरधने (उमरखेड) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जामनाला व अयडापूर हे दोन्ही प्रकल्प या उमखेड मतदार संघातील असून याचे काम पुर्ण होवून अनेक वर्ष लोटल्यानंतरही प्रकल्पाच्या वितरीकाचे काम प्रलंबित असल्याने प्रकल्प शंभर टक्के भरलेले असतांना सुध्दा आत्महत्या ग्रस्त यवतमाळ जिल्ह्यात शेतकऱ्यांना शेती करण्याकरिता पाणी मिळावे यासाठी मा.मुख्यमंत्री यांनी नागपूर येथे हिवाळी अधिवेशना दरम्यान विदर्भातील सिंचनाची क्षमता वाढविण्याबाबत सभा घेवून दिनांक १६ डिसेंबर, २०१४ रोजी निधी उपलब्ध करुन देवून शेतकऱ्यांच्या शेतीला पाणी देण्याबाबत आदेश दिल्या नंतर ही संबंधित विभागाच्या अधिकाऱ्याकडून कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(२) संबंधित विभागाकडून क्षमतेएवढ्या कामाची दुरुस्ती करुन देयके काढण्यात आली, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (१६-०३-२०१६) : (१) नाही.

जामनाला :- या प्रकल्पाच्या लघुपाटाची व इतर वितरण प्रणालीची कामे सुधारीत प्रशासकीय मान्यते अभावी मागील दोन वर्षापासून प्रलंबीत आहेत. सुधारीत प्रशासकीय मान्यतेसाठी राज्य तांत्रीक सल्लागार समिती, नाशिक कडील तपासणी होऊन नियामक मंडळाचे मान्यतेची कार्यवाही प्रगतीत आहे.

सुधारीत प्रशासकीय मान्यतेनंतर २०१६-१७ मध्ये कामे पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

अमडापूर :- सुधारीत प्रशासकीय मान्यता अभावी तसेच स्थानिक कासतकाराच्या विरोधामुळे या प्रकल्पाच्या मुख्य कालव्याची कि.मी. १० ते १४ पुर्ण होऊ शकले नाही. या योजनोला दि.०५.०२.२०१५ रोजी ७१.७२ कोटी रुपये इतक्या खर्चास तृतीय सुधारीत प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. यावर्षी रब्बी हंगाम २०१५-१६ मध्ये ८ कि.मी. पर्यंत सिंचन करण्यात आले आहे. त्यामुळे आता पुढील कालव्याची कामे करण्याकरीता कास्तकारांनी सहमती दर्शविली आहे. त्यामुळे प्रकल्पाची उर्वरित कामे जून २०१७ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजीत आहे.

(२) नाही.

जामनाला व अमडापूर हे दोन्ही लघु प्रकल्प बांधकामाधीन असल्यामुळे दुरुस्तीचे बिले (देयके) काढण्याचा प्रश्न येत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

डहाणू (जि.पालघर) तालुक्यातील सुर्या प्रकल्प कालव्याची दुरवस्था झाल्याबाबत

(४६) ३८०२५ (२२-०१-२०१६). श्री.पास्कल धनारे (डहाणू) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डहाणू (जि.पालघर) तालुक्यातील सुर्या प्रकल्प कालव्यातंर्गत १४ हजार ५०० हेक्टर जमीन सिंचनाखाली असताना पाच वर्षापासून बांधकाम व प्लॅस्टर तुटले असल्याचे दिनांक ३ नोव्हेंबर, २०१५ रोजी शासनास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त बाबींची शासनाने चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी पाहणी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, उन्हाळ्यातील भातपिकासाठी सुरळीत पाणी पुरवठा करण्याकरिता शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (१८-०३-२०१६) : (१) अंशत: खरे आहे.

(२), (३) व (४) प्रकल्पाचे सिंचन व्यवस्थापन बांधकाम कार्य प्रकारातील विभागातील उपलबध मनुष्यबळाकडून करण्यात येवून सिंचन हंगाम नियमितपणे पार पाडण्यात येतो. कालवा व वितरणप्रणालीची नियमित पाहणी करण्यात येते.

तसेच क्षतिग्रस्त बांधकामे व अस्तरीकरण कामाची तात्पुरती दुरुस्ती करुन कोकण सिंचन हंगाम पार पाडण्यात येतो.

"कोकण सिंचन हंगाम २०१५-१६" साठी अत्यावश्यक दुरुस्ती करुन दि.१७/१२/२०१५ पासून सूर्या प्रकल्पातील सिंचन आवर्तने सुरु करण्यात आली असून आजमितीस नियमित आवर्तने सुरु आहेत.

कायमस्वरुपी दुरुस्तीच्या अनुषंगाने विशेष दुरुस्ती अंदाजपत्रके तयार करण्याची कार्यवाही क्षेत्रीय स्तरावर प्रगतीपथावर आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

तापी पाटबंधारे विकास महामंडळाच्या अंतर्गत येणा-या सुकी, मोर, अभोडा व मंगरूळ या प्रकल्पाची देखभाल व दुरुस्ती निधी अभावी प्रलंबित असल्याबाबत

(४७) ३८१८९ (२०-०१-२०१६). श्री.हरीभाऊ जावळे (रावेर) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तापी पाटबंधारे विकास महामंडळाच्या अंतर्गत येणा-या सुकी, मोर, अभोडा व मंगरूळ या प्रकल्पांना मागील दोन वर्षापासून देखभाल व दुरुस्ती निधी अभावी सदरील प्रकल्पाची देखभाल व दुरुस्ती प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकल्पांची देखभाल व दुरुस्ती करण्यास निधी न मिळाल्यामुळे प्रकल्पांच्या सुरक्षेवर परिणाम झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने सदर प्रकल्पांना निधी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (१५-०३-२०१६) : (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

सातारा जिल्ह्यातील कृष्णा खोरे या दुष्काळी भागातील जिहे कठापूर उपसा सिंचन योजनेला मान्यता देण्याबाबत

(४८) ३८५७५ (२०-०१-२०१६). श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सातारा जिल्ह्यातील कृष्णा खोरे या दुष्काळी भागातील जिहे कठापूर उपसा सिंचन योजनेच्या कामाची प्रगती व सद्य:स्थिती काय आहे,
(२) या योजनेच्या कामासाठी शासनाने सन २०१४-२०१५ मध्ये १०४ कोटी रु. मंजूर केले असून या कामाला सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात न आल्यामुळे १०४ कोटी रु. अखर्चित राहिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकल्पाला अद्यापही सुधारित प्रशासकीय मान्यता न देण्याची कारणे काय आहेत,
(४) हा दुष्काळी भाग असल्यामुळे या उपसा जलसिंचन योजनेला त्वरित प्रशासकीय मान्यता देऊन मिळालेला निधी खर्च करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे ?

श्री. गिरीष महाजन (१९-०३-२०१६) : (१) कृष्णा नदीवरील कठापूर गावाजवळील बॅरेजचे काम ४५% पूर्ण झाले आहे. पंपगृह क्र. १ चे काम ३०% पूर्ण झाले आहे. पंपगृह क्र. २ चे व पंपगृह क्र. ३ चे ९५% काम पूर्ण झाले आहे सद्य:सद्यस्थितीत बॅरेज, पंपगृह क्र.१ व यांत्रिकी विभागाकडील कामे प्रगतीपथावर आहेत. योजनेची प्र.मा.प्राप्त किंमत रु. २६९.०७ कोटी (दरसूची १९९५-९६) असून या प्रकल्पावर डिसेंबर २०१५ अखेर रु. ३४१.३६ कोटी खर्च करण्यात आला आहे.
(२) सन २०१४-१५ या आर्थिक वर्षातील मंजूर (वितरीत) तरतूदीपैकी रु. ६२.४० कोटी इतका अखर्चित निधी खर्च करण्यास शासन निर्णय दिनांक ०८/१०/२०१५ अन्वये मान्यता दिली आहे.
(३) व (४) सन २०१०-११ च्या दरसूचीवर आधारीत रु. ९८०.०७ कोटी किंमतीचा प्रथम सुधारित मान्यता प्रस्तावावर शासन स्तरावरुन छाननी दरम्यान उपस्थित केलेल्या शेऱ्यांची पूर्तता क्षेत्रीय स्तरावरुन करण्यात येत आहे.

किकवी पेयजल प्रकल्प निधीअभावी बंद असल्याबाबत

(४९) ३९६२१ (२०-०१-२०१६). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक शहराची पाण्याची वाढती मागणी पूर्ण करण्यासाठी २६ ऑगस्ट, २००९ रोजी किकवी पेयजल प्रकल्पाच्या २८३.५४ कोटीच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता मिळाली असून, केंद्रीय पर्यावरण विभागाने दिनांक २८ फेब्रुवारी, २०१४ रोजी मान्यता दिली असतानाही सदर प्रकल्प निधी अभावी बंद करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर पेयजल प्रकल्प बंद केल्यास मोठे जन आंदोलन उभारण्याचा तेथील लोकप्रतिनिधींनी शासनास इशारा दिला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकल्पावर अद्याप किती खर्च झाला आहे, प्रकल्प पूर्ण करण्यास किती निधीची आवश्यकता आहे व सदर प्रकल्प किती कालावधीत पूर्ण होणे अपेक्षित आहे ?

श्री. गिरीष महाजन (१६-०३-२०१६) : (१) सदर प्रकल्पास प्रशासकीय मान्यता प्राप्त असून केंद्र शासनाच्या वन व पर्यावरण विभागाची तत्वत: मान्यता मिळाली आहे. मात्र अंतिम मान्यता अप्राप्त आहे. मा.उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद मध्य दाखल झालेल्या याचिका क्र. १२४/२०१४ मध्ये मा.उच्च न्यायालयाचे निर्देशानुसार या प्रकल्पाचे पुनर्विनियोजन करण्यात येणार आहे.

(२) लोकप्रतिनिधींनी सदर प्रकल्पास निधी उपलब्ध होणेबाबत पत्र दिलेले आहे.
(३) सदर प्रकल्पाची अद्यावत किंमत अंदाजे रु. ५५३.९२ कोटी (दरसुची सन २०१२-१३) आहे. प्रकल्पावर भूसंपादन व वनजमिन व पर्यावरण मान्यतेसाठी रु. ७.१९ कोटी खर्च झालेला आहे. प्रत्यक्षात कामास सुरुवात करण्यात आलेली नाही. मा.उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद येथे दाखल झालेल्या जनहित याचिका क्र. १२४/२०१४ मध्ये हा प्रकल्प न्याय प्रविष्ठ असून मा. न्यायालयाच्या आदेशानुसार चौकशी समिती गठीत करण्यात आली आहे. चौकशी समितीच्या अहवालानंतर प्रकल्पाबाबत निर्णय घेण्यात येईल.

अलमट्टी धरणात अशास्त्रीय पध्दतीने पाण्याची साठवणूक होत असल्याने सांगली व कोल्हापूर जिल्ह्यातील गावांना पुराचा धोका निर्माण झाल्याबाबत

(५०) ३९६२२ (२२-०१-२०१६). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) धरणामध्ये टप्याटप्याने व कशापध्दतीने पाणी साठवावे आणि धरण पूर्ण क्षमतेने कसे भरुन घ्यावयाचे, याबाबत राष्ट्रीय पातळीवर असलेले निकष न पाळता महाराष्ट्र-कर्नाटक सीमेवर असलेल्या अलमट्टी धरणात पाणी साठवून ठेवून कर्नाटक सरकार महाराष्ट्रातील सांगली व कोल्हापूर जिल्ह्यातील शहरांना व गावांना पुराचा धोका निर्माण करत असल्याची बाब माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कर्नाटकाच्या या आडमुठ्ठेपणामुळे अलमट्टीच्या बॅक वॉटरमुळे सांगली शहरासह जिल्ह्यातील गावे व कोल्हापूर जिल्ह्यातील नदी काठच्या गावांना पुराचा धोका निर्माण होत असून, सन २००५ साली या भागातील गावे महिनाभर पुराच्या पाण्याखाली येऊन प्रचंड नुकसान झाले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत त्यानुसार संभाव्य पुराच्या धोक्यापासून संरक्षण करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे ?

श्री. गिरीष महाजन (१६-०३-२०१६) : (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) याबाबत अभ्यास केलेला आहे.
(४) कर्नाटक व महाराष्ट्र राज्याच्या जलसंपदा विभाग व महसूल विभागातील अधिकाऱ्यांमध्ये समन्वय साधण्याच्या दृष्टीने मा.मुख्य सचिव, मा.प्रधान सचिव (जलसंपदा विभाग) महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली दोन्ही राज्यांच्या संबंधित अधिकाऱ्यांची दरवर्षी

पावसाळ्यापूर्वी बैठक घेतली जाते, व उपखोऱ्यातील पुराचे सनियंत्रण होण्याच्या दृष्टीने माहितीची देवाण घेवाण करुन उपखोऱ्यातील पूर विसर्ग वाहून जाणाच्या दृष्टीने विसर्गाचे नियमन करण्यासाठी आवश्यक कार्यवाही करण्यात येते. त्यामुळे सन २००७ नंतर पूरपरिस्थिती उद्‌भवलेली नाही.

विधान भवन :
मुंबई.

डॉ. अनंत कळसे
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.